
चोवीस तास
FOR ALL THE

# मुंबई, स्त्रिया आणि सार्वजनिकता दुय्यम नागरिकत्वाची दैनंदिन अनुभूती

**शिल्पा फडके, समीरा खान, शिल्पा रानडे**

मुंबईचे भवितव्य उज्ज्वल करण्यासंबंधीच्या चर्चांमध्ये महानगरातील बहुविध, संमिश्र लोकसंख्येच्या गरजांविषयी सहानुभूतीचा व्यापक अभाव जाणवतो. पायाभूत भौतिक सुविधांच्या अनुषंगाने शहारातील विविध भागांतील विविध स्तरांतील स्त्रियांच्या दैनंदिन जीवनाचा घेतलेला हा वेध दर्शवितो ती संस्थात्मक यंत्रणेपेक्षा स्त्रियाच आपल्या हिकमतीवर व चौकसबुद्धीतून दैनंदिन स्तरावर सार्वजनिक ठिकाणी स्वत:साठी सुरक्षा निर्माण करत असतात. परंतु स्त्रियांना आपल्या मर्जीप्रमाणे सार्वजनिक व्यवहारात सहभागी होण्याचा हक्क शाबूत राखायचा असेल तर सुरक्षिततेपलिकडे, व्यावसायिक व ग्राहक या ठळक स्त्री-प्रतिमांपलिकडे, नागरिक म्हणून शहराच्या संसाधनांवर हक्क सांगणे गरजेचे आहे.

बांद्रामध्ये मला सुरक्षित वाटते कारण इथे माझ्यासारखे स्वबळावर जगणारे व आम्ही करतो तसे रात्री उशीरा येऊन, उशीरापर्यंत मौजमजा करणारे अनेक आहेत. – *व्यावसायिक तरुणी, 22 वर्षे, बांद्रा*

फक्त लग्न झालेल्या, वय झालेल्या महिला पाणी किंवा रॉकेलच्या लाईनीत उभ्या राहतात. आम्ही तरुण मुलींना उभे राहू देत नाही कारण टँकर्समधून पाणी आणण्याची लाईन मेन रोडवर लागते, जेथे अनेक पुरुष घुटमळत असतात. जर तरुण मुलगी उभी राहिलीच तर पोरं शिट्ट्या मारतात, घुरतात, काहीबाही बोलतात... – *बँगनवाडी झोपडपट्टीतील महिला, गोवंडी.*

तुम्ही छेडल्यावर जर पोरगी मागे वळून तुम्हाला काही बोलली तर समजावं की तिला अजून छेडले जावे असे वाटते. – *तरुण पुरुष, धारावी.*

जेव्हा ड्रायव्हर्स आणि पुरुष नोकर आमच्याकडे टक लावून बघतात तेव्हा ते त्रासदायक वाटते. आमच्यासारख्यांना (तसा पेहराव) स्वाभाविक वाटते. पण ते जे आमच्याकडे बघतात. ते काहीच्या काही कल्पना करतात. – *मलबार हिलला राहणारी मुलगी, 17 वर्षे*

जर तुम्ही तुमच्या वाहनातून प्रवास करत असला तर ठीक. पण जर तुम्ही बस, ट्रेनने प्रवास करत असाल आणि लोकांना आवडणार नाही असे जर तुम्ही काही घातले असेल..

तर प्रत्येकजण तुमच्याकडे बघणार. (मग) ती तुमची निवड असेल. – *स्त्री वकील, 25 वर्षे, नरीमन पॉईंट*

दिवे आणि सोबत पुरुष असला की सुरक्षित वाटतं. पण मुंबई इतर ठिकाणांपेक्षा अधिक सेफ आहे, इथे आपण कधीही कुठेही जाऊ शकतो. – *विशीतील गृहिणी, काळा चौकी.*

नियोजकांसाठी मुंबई म्हणजे नगरपालिका प्रशासनाच्या हद्दीत असलेली निश्चित अशी एक वस्तू. परंतु मुंबई याहूनही अधिक काही आहे आणि कधी कधी याहूनही कमी. इथे राहणाऱ्या अनेकविध लोकांच्या नाना कल्पनांतून साकारलेली ती एक सामूहिकता आहे. तरीही, शहराच्या नियोजनात ही वैविध्यता क्वचितच प्रतिबिंबित झालेली दिसते. आज जेव्हा मुंबई आंतरराष्ट्रीय पटावर 21व्या शतकातील एक 'ग्लोबल सिटी' म्हणून आपली छबी उभारण्यात गर्क आहे, तेव्हा हे शहर नेमकं आहे तरी कुणाचं हा प्रश्न उपस्थित होतो.

'व्हिजन मुंबई'च्या दस्ताऐवजावर ज्या कुणाचे थोडेफार नाव आहे अशा जवळपास सर्वांनी आपले मतप्रदर्शन केले आहे. काही सिंगापूरकडून तर काही शांघायकडून मुंबईसाठी प्रेरणा घेत आहेत. या जागतिक आकांक्षांना कवेत घेणारी दृष्टी तिच्या संकुचित उद्दिष्टपूर्तींमध्ये जे अडथळे बनत आहेत अशा तमाम जनसमूहाला वगळते. अनेक शहर नियोजन अधिकारी गोलंकार, तटस्थ व्यक्ती आहे असेच गृहीत धरतात. ही भूमिका ज्यांचे शहराच्या संसाधनांवरील दावे मोघम राहिले आहेत अशा मुले, विकलांग, वृद्ध, झोपडपट्टीवासीय, फेरीवाले आणि निराश्रीतांसारख्या शहरातील अधिक असुरक्षित गटांच्या उपस्थितीकडे पद्धतशीरपणे दुर्लक्ष करते - आणि या सर्व गटांमध्ये स्त्रिया पुरुषांपेक्षा अधिक वंचित आहेत.

याच सुमारास, ज्यांना खऱ्या अर्थाने 'सार्वजनिक' म्हणता येईल अशा सर्वांना मोकळ्या, नि:शुल्क जागा वेगाने घटत आहेत. अशा जागांची संख्या रोडावत असतानाच दुसरीकडे ज्यांचे शहराशी 'नाते' नाही असे स्थलांतरित गरीब, समाजबाह्य व छुपे दहशतवादी म्हणून पाहिले जाणारे मुस्लीम, छेडछाड करणारे निम्न वर्गीय पुरुष आणि संभाव्य बळी ठरणाऱ्या सर्व स्तरांतील महिला, अशांप्रती असहिष्णुता वाढत आहे.

शहरांसंबंधी जगभराचे अभ्यास दाखवून देतात की महानगराच्या आखणी आणि नियोजनामध्ये स्त्रियांच्या नागरिक म्हणून विशेष गरजा लक्षात घेतल्या जात नाहीत. आम्ही गेली तीन वर्षे मुंबईची सार्वजनिक स्थळं लिंगभावात्मक असमता कशा प्रकारे प्रतिबिंबित व पुनर्निर्मित करतात याचा मागोवा घेतला. कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी विशिष्ट वेळेस उपस्थित असलेल्या महिलांची संख्या हे विषय वास्तव अधोरेखित करते. आम्ही चेंबूर, पायधुणी, नरीमन पॉईंटच्या वस्त्यांमधून केलेली गणना दर्शविते की स्त्रियांची जास्तीत जास्त टक्केवारी उपस्थित दुपारच्या सुमाराला चेंबूर येथे 28 टक्के होती, तर सर्वांत कमी, रात्री साडेनऊच्या सुमारास, पायधुणीत2.5 टक्के होती.

मुंबईतील स्त्रिया ह्या या शहराइतक्याच वैविध्यपूर्ण आहेत. त्यामुळे 'मुंबईतील स्त्रियां'चे प्रतिनिधित्व करण्याच्या प्रयत्नातील गुंतागुंत आमच्या संशोधनाचा महत्त्वाचा पैलू होता. आम्ही सुरक्षितता, जोखीम आणि सन्मान या तीन संकल्पनांभोवती आमचे संशोधन गुंफण्याचे ठरविले. आम्हाला याची जाणीव होती की अधिककरून 'सन्माना'ची चर्चा ही मध्यम वर्गीय, उच्च जातीय, विषमलिंगी, विवाहित वा विवाहइच्छुक स्त्रियांच्या अनुषंगानेच होते. जरी 'सुरक्षितते'संबंधीचे सार्वजनिक वाद सर्व स्तरांतील स्त्रियांना तितकेच लागू होत असले तरी ते मुख्यत्वे मध्यम वर्गीय, उच्च जातीय स्त्रीभोवतीच अधिककरून कल्पिले गेले आहेत याचे आम्हाला भान होते. किंबहुना, आमच्या संशोधनातील सहकाऱ्यांचे व सहभागी होणाऱ्यांचे आकलन याच चर्चाविश्वाने घडविले असल्यामुळे आम्ही जाणीवपूर्वक याच स्त्रीला आमच्या संशोधनाच्या केंद्रभागी ठेवले. हे पांढरपेशीय पूर्वग्रहाचे लक्षण न मानता, 'जागतिक' मुंबईमधील शहरी स्त्रीच्या सर्रास लोभस व्यक्तिमत्त्वालासुद्धा, स्वबळावर जोखीम पत्करून, शहराशी संवाद साधायला अशक्य बनते, याचेच ते द्योतक मानावयास हवे. म्हणजेच, ज्या स्त्रिया

सामाजिक संकेतांना अनुसरून वागतात त्यांना तरी सार्वजनिक जागा किती सुसह्य वाटतात?

प्रसार माध्यमांनी दखल घेतलेल्या स्त्रियांवरील लक्षवेधक हल्ल्यांवरच लक्ष केंद्रित न करता, शहराचा वेध घेत असताना आम्ही रस्ते, बाजार, रेल्वे स्थानक, बस स्टॉप, उद्यानं, कॅफे यांसारख्या सार्वजनिक ठिकाणी स्त्रियांच्या दैनंदिन व्यवहारांना महत्त्व दिले. यामागे, स्त्रियांचे शहराशी असलेले नाते हे घटनाक्रमांतून नव्हे तर प्रतिक्रियांतून जाणून घेण्याचा आमचे हेतू होता. जरी बलात्कार आणि ॲसिड हल्ल्यासारख्या घटना सार्वजनिक स्थळी स्त्रियांना भेडसावणाऱ्या असुरक्षिततेकडे लक्ष वेधतात तरी अशा हिंसेच्या अतिरेकी कृत्यांवर भर देऊन सार्वजनिक जागा स्त्रियांना असुरक्षित आहेत असे ठरवून स्त्रियांवर आणखी कौटुंबिक आणि सामुदायिक बंधनं लादली जातात. आमच्या दृष्टीने अजून अर्थपूर्ण म्हणजे, सुट्ट्या-सुट्ट्या तऱ्हेने अशा घटनांवर प्रकाशझोत टाकल्याने सार्वजनिक स्थळी जाणवणारा दैनंदिन प्रतिकूलतेचा मुकाबला स्त्रिया कशा करतात याकडे दुर्लक्ष होते.

तसेच, दैनंदिन स्तरावर सार्वजनिक ठिकाणी होणारा संचार व त्यांच्यावरील ताबा याद्वारे सूक्ष्म सत्तासंबंधाची पुनर्निर्मिती होत राहते, या आकलनापायीच आम्ही दैनंदिनतेवर लक्ष केंद्रित करायचे ठरवले. पुरुष व स्त्री देहांनी अव्याहतपणे पुरुषत्व आणि स्त्रीत्वाच्या समाजमान्य धारणांना आविष्कृत केले पाहिजे व औचित्याच्या या मर्यादांचे उल्लंघन केल्यास सामाजिक स्वास्थ्यास धोका पोहचतो अशी या दैनंदिन व्यवहारांमागील एक प्रबळ धारणा आहेत

पाली हिल ते काळा चौकी, लोखंडवाला ते धारावी, मलबार हिल ते डोंगरी या शहरांच्या विविध विभागांतील विषयाधारित गट चर्चांचून, बहुविध स्थळांच्या प्रत्यक्ष पाहणींतून, सर्व जातीधर्मवर्गातील स्त्रियांच्या मुलाखतीतून आम्हा स्त्रियांना त्याना समाधानकारक वाटलेल्या जागा/वस्त्या यांचे स्मरण करून स्त्रियांच्या सुरक्षितता व स्वास्थ्याची काळजी घेतली जाईल असे पायाभूत सुविधांमधील बदल सुचविण्यास सांगितले. अपेक्षेप्रमाणे, स्त्रियांनी उल्लेखिलेले मुद्दे मुंबईच्या भवितव्याबद्दलच्या प्रसिद्ध चर्चेत क्वचितच आढळतात. किंबहुना, स्त्रियांनी कल्पिलेले शहर नियोजकांच्या आराखड्यांना अनेक प्रकारे छेद देते. उदाहरणार्थ, या जागतिक महानगराच्या दुखण्यांवर तरुणोपाय म्हणून झोपड्या व फेरीवाल्यांना हटविण्याच्या मोहिमेसंबंधात विचारता, स्त्रियांना, उलट, रस्त्यांवरील फेरीवाले हे सुपरिचित आधार वाटतात असे स्पष्ट होते – जसे, पाली हिल येथील एका विषयकेंद्रित गटचर्चेत सहभागी झालेल्या महिलेने कळविले, ''कोपऱ्यावरील भेळपुरीवाल्यापेक्षा आमचा वॉचमन अधिक नेमाने बदलतो,'' नरीमन पॉईंट येथील कॉर्पोरेट महिलांच्या एका गटाने खाण्याचे ठेले अधिक आपलेपणा देतात व त्यामुळे, खासकरून रात्रीच्या वेळी, परिसर कमी धोकादायक वाटतो, असे सांगितले. मध्य मुंबईतील काळा चौकी येथे राहणाऱ्या व कॉटन ग्रीनवरून लोकलने नेहमी प्रवास करण्याऱ्या महिलांनी नोंदवले की जेव्हापासून प्लॅटफॉर्मवरील तीन खाण्याचे ठेले बंद करण्यात आले तेव्हापासून त्यांना स्टेशनात कमी सुरक्षित वाटू लागले. तसेच, चर्चगेट रेल्वे स्थानकापासून फोर्ट भागात कामानिमित्त ये-जा करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना 2005 मध्ये फुटपाथवरील पुस्तक विक्रेत्यांना हटविल्यापासून तो विभाग दिवस मावळल्यानंतर अधिक असुरक्षित वाटू लागला आहे.

जेथे राहत्या आणि व्यापारी संकुल/आस्थापनांची दाटीवाटी आहे अशा ठिकाणी रात्री उशीरापर्यंत दुकानं उघडी असल्यामुळे दिवस-रात्र तेथे जाग असते आणि परिसर अधिक प्रकाशमान राहतो. यामुळे स्त्रियांचा सार्वजनिक वावरही वाढतो, निवासी, व्यापारी आणि औद्योगिक विभागांत शहराचे झोनिंग केल्यास, सार्वजनिक व खाजगी अशी विभागणी करणारे प्रचलित लिंगभावात्मक द्वैत पुनर्प्रस्थापित होऊन, स्त्रिया चार भिंतीआड झाकल्या जाण्याची शक्यता वाढते. जेथे असे झोनिंग नाही तेथे स्त्रिया,

घर व मुलांची अजूनही बाळगावी लागणारी प्राथमिक जबाबदारी सांभाळत, ग्राहक, कर्मचारी इ. बहुविध स्वरुपांत आपले सार्वजनिक अस्तित्त्व टिकवून ठेवू शकतात.

सार्वजनिक ठिकाणी स्त्रिया सुरक्षिततेबाबत निश्चित राहू शकत नसल्या तरी व त्यांना सुरक्षिततेची जाणीवपूर्वक जोपासना करावी लागत असली तरी अनेक बाह्य घटक स्त्रियांची सार्वजनिक उपस्थिती वाढविण्यास सहाय्यक ठरू शकतात. घर हे स्त्रियांचे 'उचित' स्थान आहे असे मानणारी विचारसरणी तर बदलायला हवीच तसेच सार्वजनिक ठिकाणी स्त्रियांच्या गरजांची दखल घेणाऱ्या भौतिक पायाभूत सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे.

सार्वजनिक शौचालयं, सार्वजनिक वाहतूक आणि सार्वजनिक उद्यानांसारख्या पायाभूत सुविधांमुळे शहर स्त्रियांपुरतेच नव्हे तर गरीब, वृद्ध, विकलांग, मुलं यासारख्या परीघावरील इतर घटकांसाठीसुद्धा खेळीमेळीचे बनते. आमची धारणा आहे की पायाभूत सुविधांसंबंधी प्रश्न हे हक्क आणि नागरिकत्वाच्या अनुषंगाने तपासले गेले पाहिजेत. ज्या पायाभूत सुविधा विशिष्ट समाज गटाप्रती भेदभाव करतात त्या त्याच्यासाठी चलनवलनाच्या दैनंदिन समस्या निर्माण तर करतातच तसेच समाजव्यवस्थेत त्याचे दुय्यम स्थानही अधोरेखित करतात. एका गटाच्या (सामान्यपणे धडधाकट, उच्च वर्गीय, उच्च जातीय पुरुषाच्या) गरजांना प्राधान्य देणाऱ्या पायाभूत सुविधा पितृसत्ताक समाजव्यवस्थेला शाबूत ठेवणारी यंत्रणाच बळकट करतात.

इतर शहरांपेक्षा मुंबईमध्ये स्त्रियांना अधिक हिंडते फिरते ठेवण्यामध्ये शहरातील सार्वजनिक वाहतुकीचे मोठेच योगदान आहे. बस, लोकल, टॅक्सी आणि रिक्षांचे विकसित जाळे असलेली शहरातील सार्वजनिक वाहतूक सेवा ही देशात सर्वोत्तम आहे. कामाच्या ठिकाणाहून लोकांचा दिवसा 40 कि.मी. किंवा त्याहूनही अधिक प्रवास शक्य करणाऱ्या या वाहतूक व्यवस्थेची स्त्रियांचा रोजगार वाढविण्यात महत्त्वाची भूमिका राहिली आहे.

तरीही, सार्वजनिक वाहतूक सेवेतील पायाभूत सुविधांविषयी अनेक मुद्दे शिल्लक आहेत. बस व लोकलच्या स्थानकांवर शौचालय व दिव्याचे अपुरे नियोजन, लोकलच्या वेळापत्रकाविषयी परिपूर्ण माहिती सहज उपलब्ध नसणे तसेच त्यांची अस्पष्ट घोषणा, एका अनियमित प्रवाशाची चिंता मात्र वाढवतात, परंतु प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयीपलिकडे या बाबींचे महत्त्व आहे. त्यातून बहुविध, संमिश्र लोकसंख्येच्या गरजांविषयीच्या सहानुभूतीचा व्यापक अभाव जाणवतो.

सार्वजनिक वाहतूक स्त्रियांना मुंबईमध्ये स्वतःच्या हिकमतीवर व एका सुलभ आणि पर्याप्तदृष्ट्या सोयीस्कर पद्धतीने ये-जा करण्यास शक्य बनविते हे जरी खरे असले तरी आमची पाहणी सूचविते की घाईगर्दीच्या वेळी उडणारी झुंबड हाताळण्यासाठी या सुविधांमध्ये सुधार होणे स्त्रियांसाठी पुरेसे नाही. स्त्रियांची सार्वजनिक उपस्थिती एका हद्दीपलीकडे वाढविण्याकरिता या पायाभूत सुविधांबरोबरच स्त्रियांना त्यांच्या मर्जीनूसार सार्वजनिकतेत सहभागी होण्यास अधिमान्यता मिळणे गरजेचे आहे.

स्त्रियांसाठी सार्वजनिक शौचालयांचा अभाव ही शहराच्या पायाभूत सुविधांमधील अजून एक मोठी उणीव आहे. सार्वजनिक शौचालय हे सार्वजनिक ठिकाणी अनुभवास येणाऱ्या पुरुषी वर्चस्वाचे सर्वात ठळक लक्षण आहे. मुंबईमध्ये स्त्रियांसाठीच्या सार्वजनिक शौचालयांची कमतरता ही एका अर्थी स्त्रियांच्या गरजा व नागरिक म्हणून त्यांची प्रतिष्ठा अव्हेरण्याचाच पवित्रा आहे. स्त्रिया सार्वजनिक नागरिक म्हणून गृहित न धरणे तसेच रुढीने स्त्री देहाला चिकटलेली विटाळाची संकल्पना, यामुळे स्त्रियांच्या शरीरिक आवश्यकतांबद्दलची कुठलीही चर्चा लज्जास्पद ठरते. मुंबईमध्ये स्त्रियांसाठी सार्वजनिक शौचालयांचा लक्षणीय प्रमाणात तुटवडा आहे यास मुंबईत राहणारी कोणतीही महिला साक्षी राहिल. जी शौचालयं आज शहरात अस्तित्वात आहेत त्यांमध्ये दोन-तृतीयांश जागा पुरुषांसाठीच्या मुतारी व शौचालयांनी व्यापलेली असते व

फक्त एक-तृतियांश जागा स्त्रियांसाठी ठेवलेली आढळते. शहरांमधील महिलांसाठीच्या शौचालयांची संख्या तर अपुरी आहेच, तसेच शौचालयांची ठेवणही स्त्रियांच्या खास गरजांची उघड उपेक्षा दर्शवितात, शौचालयांच्या आखणीत तान्हुल्यांना घेऊन असलेल्या महिलांचा तर मुळीच विचार केलेला आढळत नाही.

महिला व इतर सीमांत समाज गटांचा सार्वजनिक व्यवहारांतील वावर वाढविण्यासाठी धोरणात्मक स्तरांवरील हस्तक्षेपांव्यतिरिक्त सार्वजनिक सुविधांचे नियोजन व नकाशाही कळीची भूमिका बजावतात. उदा. स्पष्ट दृष्टिपथ, आगमन-निर्गमनासाठीचे सुलभ मार्ग आणि पर्याप्त प्रकाशयोजना असलेल्या ठिकाणी स्त्रियांना खूप अधिक सुरक्षित वाटते. दुर्दैवाने, यापैकी अनेक आवश्यकतांचा प्रचलित शहरी नियोजनाच्या सौंदर्यानुभवामध्ये अभावच दिसतो. उद्यानांचेच उदाहरण घेता येईल. उंच कुंपणं असलेल्या, निर्गमनासाठी मोजक्याच जागा असलेल्या, दृष्टिआड येणारी कडेला दाट झाडी असलेल्या उद्यानांचा उपभोग कोणतीही स्त्री-पुरुषाच्या साथीशिवाय घेऊच शकत नाही.

शहरातील महाविद्यालयांमधील पदवीक्रमांतील विद्यार्थ्यांबरोबर आम्ही राबविलेला उपक्रम दर्शवितो की त्यांचे शहरी रचनांमधील सौंदर्य व जीवनानुभवातील फारकत याचे भान सहसा सुटते. त्यांना प्रयत्नांती कळून चुकते की ज्या फूटपाथचा ते आकृतिबंध तयार करत आहेत त्या फूटपाथवर त्यांनाच चालणे सुरक्षित वाटणार नाही. एका प्रकरणाभ्यासात आम्ही त्यांना एक कल्पित रस्ता ओलांडताना ते कोणत्या मार्गाने जातील याबद्दल विचारले. या कल्पित रस्त्याच्या एका कडेला उद्यान आहे व त्याला लागूनच असलेला फुटपाथ दोन्ही बाजूंनी नीट कुंपण घातलेला व झाडांनी नटलेला आहे. (शहरांचे आराखडे रचणाऱ्यांची तर ही सर्वांत रम्य व आवडती कल्पना आहे.) रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला एक निम्न मध्यम वर्गीय चाळ आहे, ज्याते व्यवहार रस्त्यावर ओसंडून वाहत आहेत. लक्षणीय म्हणजे, बहुसंख्य विद्यार्थ्यांनीनी चाळीनजीकच्या कडेवरून चालणे पसंत केले. कारण कितीही गजबजाट असला तरीही त्यांना तेथून चालणे सुरक्षित वाटले. ज्यांनी उद्यानाच्या कडेने चालण्याची निवड केली त्यांनीसुद्धा आखीव-रेखीव फुटपाथपेक्षा रस्त्याच्या कडेनेच चालणे पसंत केले. एखाद्या हल्ल्याच्या कमी दृगोचरता असलेला झाडांनी आच्छादित रस्ता पळ काढायला सोयीचा नाही म्हणून अधिकतर महिला रस्त्याच्या दुसऱ्या कडेने जाणं पसंत करतात.

थोडक्यात, नीटनीटकेपणा व तुरळक वर्दळ असलेले रस्ते म्हणजे सुरक्षित किंवा निश्चितता नव्हे. किंबहुना, सौंदर्यीकरणाच्या सर्वसामान्य समजुतींच्या उलट, स्त्रियांना टापटीप व आखीव-रेखीवपणापेक्षा गोंगाट व धावपळ अधिक आश्वासक वाटतात. पुरुषांचे प्राबल्य नसलेली गर्दीही स्त्रियांना निर्मनुष्य परंतु सुंदर रस्त्यांपेक्षा अधिक सुखकारक वाटते. परंतु चकमकीत, झगमगीत सार्वजनिक जागांच्या दृश्यात्मकतेने प्रभावित, मुंबईला 'जागतिक दर्जा'चे शहर बनविण्याच्या कल्पनेभोवती उभारलेले शहरी नियोजनाचे नवीन मनसुबे सौंदर्यात्मक अनुभूतीला प्राधान्य देतात. उलटपक्षी, आमच्या मते, आजवर गृहीत धरलेल्या व्याप्तीपेक्षा शहरी नियोजनाचे वादक्षेत्र अधिक विस्तृत आणि गुंतागुंतीचे आहे. जोवर धडधाकट, उच्च जातीय, उच्च वर्गीय पुरुषांच्याच गरजांना केंद्रभागी ठेवून शहरी नियोजन आखले जाईल तोवर निरपेक्ष नागरिकत्वाच्या भाषेतून स्त्रिया वर्जच असतील.

महिलांच्या सुरक्षिततेबाबत मुंबईचा नावलौकिक असला तरी आमच्या संशोधनानुसार ही सुरक्षितता पायाभूत सुविधा वा पोलीस यांसारख्या संस्थात्मक यंत्रणेतून न येता, स्त्रियांना ती दैनंदिन स्तरांवर कसोशीने व चौकसपणे निर्माण करावी लागते. ही सुरक्षितता लाभण्यासाठी स्त्रियांना त्या संरक्षणास पात्र आहेत हे सिद्ध करण्यासाठी स्वत:ची 'सन्माननीय' अशी प्रतिमा उभी करावी लागते. आमच्या चर्चेतून हे उघडकीस आले की सार्वजनिक स्थळी त्यांचा वावर वाढविण्यासाठी

स्त्रियांना कल्पकता लढवून त्या 'सुशील' स्त्रिया असल्याचे प्रदर्शित करावे लागते कधी काळी मिरीची पूड घेऊन तर कधी मोबाईलवर बोलणे रेंगाळत ठेवून, कधी गटाने तर कधी पुरुष साथीदाराच्या सहाय्याने प्रवास करून स्त्रियांना स्वत:साठी सुरक्षा निर्माण करणे भार पडते. असे मनोगत शहरभर विखुरलेल्या स्त्रियांनी वर्तविले. तसेच, मोठ्या पिशव्या घेऊन, कपडे नेसण्यावर लक्ष ठेवून व परपुरुषाच्या नजरेला नजर न भिडवता स्त्रियांना सन्मान व प्रयोजन सक्रियपणे निर्माण करावे लागतात.

जरी स्त्रियांना ओळखपाळख असलेल्या त्यांच्या निवासी परिसरात अधिक शारीरिक सुरक्षितता जाणवत असली तरी त्यामुळं त्यांचा सार्वजनिक वावर आपोआप विस्तारतो असे होत नाही. उलट, चिरपरिचित ठिकाणीसुद्धा त्यांच्यावर बंधने येतात. बहुजिनसी वस्त्यांपेक्षा एकाच किंवा एकसारख्या समुदायांनी भरलेल्या हाऊसिंग सोसायट्या, इमारती, चाळी व झोपडपट्ट्या स्त्रियांच्या हालचालींवर मर्यादा घालतात. याच रहिवाशांकडून एकट्या, घटस्फोटित किंवा ज्यांनी सामाजिक नीतिनियम झुगारले आहेत अशा स्त्रियांना कटुता आणि छळ सोसावा लागला आहे. किंबहुना, सार्वजनिक ठिकाणी सुरक्षितता निर्माण करत राहण्याच्या गरजेमुळे घराच्या चार भिंतीआड होणाऱ्या हिंसेच्या शक्यतेचे गांभीर्य नजरेआड होते.

मुंबईतील मोकळ्या जागा वेगाने घटत आहेत. सरकार जे काही सार्वजनिक उरले आहे. त्यांची जोपासना करण्यात सरकारला फार काही रस नाही. न्यायालयांमध्येही या मुद्याबाबत एकवाक्यता नाही, ही त्याहूनही अस्वस्थ करणारी बाब आहे. अशा सार्वजनिक ठिकाणी मॉल्स, कॉफी शॉप्स आणि नाईट क्लब्ससारखी उपभोगाची नवीन दालनं उभी राहत आहेत. जरी या नवी संस्कृतीतील सार्वजनिक खाजगी अवकाश स्वत:ला सर्वांसाठी खुले असल्याचे भासवत असले तरी ते स्त्रियांच्या एका ठराविक व निवडक प्रतिमेला प्रक्षेपित करणाऱ्या जागतिक आधुनिकतेचेच चित्र पुढे करते.

मध्यम वर्गीय स्त्रीच्या सन्मानाची सुरक्षा व्हायला हवी या मागणीला व्यापक पाठिंबा मिळतो. प्रसार माध्यमं, कॉर्पोरेट विश्व, पोलीस व इतर शासकीय संस्था व पदाधिकाऱ्यांकडून या मागणीला त्वरित दुजोरा मिळतो. व्यावसायिक आणि ग्राहक या स्वरुपांत स्त्रियांची प्रतिमा ठळक करणे हे केवळ सुरक्षेसाठी नव्हे तर आधुनिकता सूचित करणाऱ्या जागतिक शहराची संकल्पना रुजविण्यासाठी आवश्यक आहे. शिक्षण आणि रोजगारातील स्त्रियांच्या वाढत्या सहभागाबरोबरच त्यांची सार्वजनिक उपस्थिती वाढली आहे. घराबाहेरील वातावरणात स्त्रियांना सुखरुपता हवी असली तरी त्यांना त्यांच्यावर पहारा नको आहे. दैनंदिन हिंसा व छळापासून संरक्षण तर हवे आहे परंतु ते केवळ प्रतिष्ठित मध्यम वर्गीय स्त्री पुरतेच मर्यादित न राहता ते सर्व स्तरांतील - लिंगकाम करणाऱ्या स्त्रिया, डान्स बारमधील नर्तिका, साडीधारी, बुरखाधारी - स्त्रियांना मिळायला हवी.

शहराच्या भवितव्याविषयीची चर्चा ही सुरक्षिततेच्या पलीकडे सर्वांचा सार्वजनिक व्यवहारांत नागरिक म्हणून सहभागी होण्याचा हक्क शाबूत राखणारी असावी, असे आमचे प्रतिपादन आहे. शहराची पुनर्व्याख्या करताना स्त्रिच्या 'उचित स्थाना'विषयीच्या विचारसरणात्मक गृहितकांना तर गाडले गेले पाहिजेच, तसेच स्त्रियांच्या अधिक अर्थपूर्ण व परिपूर्ण नागरिकत्वाच्या हक्कांविषयीचे दावे प्रकर्षाने पुढे आले पाहिजेत.

**टिपा :**

1) मॅकेंझी या आंतरराष्ट्रीय सल्लागार संस्थेने कॉर्पोरेट जगताचे पाठबळ असलेल्या मुंबई फर्स्ट या संस्थेसाठी तयार केलेल्या अहवालात सर्वप्रथम 'व्हिजन मुंबई' या कल्पनेचा उवाच केला. विलासराव देशमुख यांच्या राज्य सरकारने 2004-05 साली मुंबईच्या या भावी आराखड्याला अनुमोदन दिले.
2) गेली तीन वर्षे इंडो-डच प्रोग्रॅम फॉर अल्टरनेटीव्ह डेव्हलपमेंट या कार्यक्रमाचे अर्थ सहाय्य लाभलेल्या

पार्टनर्स फॉर अर्बन नॉलेज ॲक्शन अँड रिसर्च (पुकार) या बिगर शासकीय आंतरविद्याशाखीय संशोधन संस्थेच्या 'जेंडर अँड स्पेस' या उपक्रमांतर्गत मुंबईच्या नगरपालिका हद्दीतील वेगवेगळ्या वर्गीय, धार्मिक, भाषिक समूहांनी बसलेल्या चौदा वस्त्यांचा आम्ही अभ्यास केला. या वस्त्यांमधील मुलाखती व विषयकेंद्रीत गट-चर्चांव्यतिरिक्त या विभागांची आम्ही वास्तुशास्त्रीय सर्वेक्षणही केली. तसेच, शहरातील पाच उपनगरीय रेल्वे स्थानकं, चार उद्यानं, तीन मॉल्स व चार कॉफी शॉप्स यांचीही प्रजातीय निरीक्षणे केली. याच काळात समाजशास्त्र, इतिहास, वास्तुशास्त्र, उपयोजित कला व प्रसारमाध्यमातील पदवीस्तरीय विद्यार्थ्यांसाठी तीन दीर्घ अभ्यासवर्ग व अनेक ठराविक मुदतीच्या कार्यशाळा आयोजित केल्या. या निमित्त घडलेल्या चर्चांचाही आम्हाला आमच्या विश्लेषणात फायदा झाला व अर्थी, मुलाखती, गटचर्चा व्यतिरिक्त, आम्ही आमच्या संशोधनातून छायाचित्रकला, वास्तुशास्त्र, चित्रपट, प्रसार माध्यमं त्यांच्या विश्लेषणाद्वारे दृश्यात्मक दस्ताऐवजीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले.

3) मध्य मुंबईतील कापड गिरण्या बंद पडल्यामुळे उपलब्ध झालेल्या सातशे एकर जमिनीपैकी एक-तृतीयांश हिस्सा प्रत्येकी स्वस्त गृहबांधणी व सार्वजनिक जागा यांसाठी वापरला जावा या मुंबई उच्च न्यायालयाच्या निवाड्याला रद्दबातल ठरवत, सर्वोच्च न्यायालयाने 2006 साली ही सर्व जमीन विक्रीस काढण्यास परवानगी दिली.

**समाज प्रबोधन पत्रिका यांच्याकडून साभार**

■ ■ ■ ■ ■

